# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०७/२०२५ (शुक्रवार)**

---

## अल्पवयीन मुलांना तंबाखुजन्य पदार्थ विक्री करून सेवन करण्यास जागा उपलब्ध करून देणाऱ्या आरोपीतांवर गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन काटोल:—** दिनांक १७/०७/२०२५ रोजी काटोल पोलीसांना माहीती प्रात्प झाली की,द न्यु चाय सुट्टा कॅफे दुकान येथे अल्पवयीन मुलांना तंबाखुजन्य पदार्थ विक्री केली जाते या बाबत एक व्हिडीओ व्हायरल झालेला आहे. काटोल पोलीसांनी तात्काळ द न्यु चाय सुट्टा कॅफे, ब्लॉक क्रमांक ७, जगतगुरू तुकाराम महाराज व्यापारी संकुल, नगर परीषद काटोल येथे जावुन पाहणी केली असता सदर कॅफे च्या कांउटर आरोपी क्रं १) नामे रूपल जगदिश गजभिये, वय २१ वर्षे,रा घोडे प्लॉट, काटोल हा मिळुन आला. तसेच सदर कॅफे कोणाच्या मालकीचे आहे याबाबत विचारना केली असता आरोपी क्रं २) नामे रोशन दिपक बोरडे, वय ३० वर्षे, रा.सिंगारखेडा ता. नरखेड जि नागपुर अशी माहीती प्राप्त झाली. तसेच सदर दुकान दिपक बोरडे याने त्याचा लहान भाउ आरोपी क्रं ३) भुषण दिपक बोरडे, वय २८ वर्षे, याला चालविण्यास दिलेले असल्याची माहीती समजली. आरोपी रूपल जगदिश गजभिये याला अधिक विचारपुस केली असता त्याने सांगितले की, ५ ते ६ दिवसांपुर्वी एक १३ ते १४ वयोगटातील मुलगा एकटाच आला आणि त्याने दुकानातुन सिगारेट खरेदी केली दुकानात बसुन तिचे सेवन केले. नमुद आरोपीतांनी सदर मुलगा अल्पवयीन आहे हे माहीत असतांना सुध्दा त्याला सिगारेट विकत दिली आणि त्याला जागा उपलब्ध करून दिली.

नमुद आरोपी क्रं १ ते ३ यांच्या विरूध्द कलम ७७ मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सदर दुकानाचा परवाना रद्द कारण्यासाठी संबधीत कार्यालयाला पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

नागपुर ग्रामीण पोलीसांकडुन जनतेला आवाहन करण्यात येते की, अल्पवयीन मुलांना कोणतेही मादक पदार्थ अथवा तंबाखूजन्य पदार्थ सेवन करण्यास देणे, विक्री करणे हा गुन्हा असून अशा प्रकारच्या घटना निदर्शनास आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला किंवा डायल ११२ वर संपर्क करून माहीती दयावी.



# पोलीस स्टेशन बोरी हददीमध्ये हरविलेले/गहाळ झालेले १५ मोबाईल त्यांचे मुळ मालकांना परत देण्यात आले

नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत पोलीस स्टेशन बोरी हददीमध्ये सन २०२४ ते २०२५ गहाळ झालेले वेगवेगळया कंपनीचे अ‍ॅड्रॉईड मोबाईलचा बोरी पोलीसांनी सायबर पोलीस स्टेशन नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मदतीने तांत्रीक पदधतीने शोध घेवून CEIR पोर्टलचा वापर करुन १० नागरिकांचे मोबाईल दिनांक १८/०७/२०५ रोजी पोलीस स्टेशन बोरी येथे त्याचे मुळ मालकांना परत केले. मोबाईल मुळ मालक नामे १. अमोल वानखेडे, रा. जुनी वस्ती यांचा टेक्नो कंपनीचा मोबाईल, २ सतिष शेषराव शेळके, रा.सातगाव यांचा रिअल मी ११ प्रो कंपनीचा मोबाईल, ३. राकेश सिंग, रा.जुनी वस्ती बोरी यांचा व्हिवो वाय २९ कंपनीचा मोबाईल, ४. प्रविण सिहोरे, रा.सातगांव यांचा व्हिवो वाय ११ कंपनीचा मोबाईल, ५. कुंदन ताजणे रा. ,अमरावती यांचा वन प्लस कंपनीचा मोबाईल , ६.रोहीत डोंगरे, रा.सातगाव रिधोरा यांचा मोटोरोला कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट, ७. मुस्ताक शेख, रा. बुटीबोरी यांचा रेडमी कंपनीचा मोबाईल, ८. निर्भया दुपट्टे, रा.जुनी वस्ती बोरी यांचा ओप्पो कंपनीचा मोबाईल, ९. अन्सांर शेख रा. बुटीबोरी यांचा ओप्पो कंपनीचा मोबाईल १०.मुकेश पटेल, रा.बोरी यांचा ओप्पो कंपनीचा मोबाईल असे मोबाईल श्री. दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग यांच्या हस्ते त्यांचे मिळुन आलेले मोबाईल परत देण्यात आलेले आहे. सदर वेळी पोलिस निरीक्षक श्री प्रतापराव भोसले,प्रभारी अधिकारी पोस्टे बोरी यांचेसह बोरी पोलीस स्टेशन चे अधिकारी अंमलदार हजर होते. **यापुर्वी** दिनांक १०/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन बोरी येथे त्याचे मुळ मालकांना परत केले. मोबाईल मुळ मालक नामे १) निखिल सुरेश वासे, रा. १४६ श्रीकृष्ण नगर , बुटीबोरी ,२)श्री प्रतिक सुभाष हडगे, रा. पुष्कर सोसायटी , बुटीबोरी , ३) भुषण कुंभलकर, रा. सातगाव रोड, बुटीबोरी ४) सौ. बबीता निकेश सहारे, रा. बुटीबोरी, ५) श्री गणपत बालकृष्ण चिकणकर, रा. बुटीबोरी, यांना परत केले आहे.

**नागपुर ग्रामीण पोलीसांकडुन नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नागरिकांनी त्यांचा मोबाईल हॅन्डसेट गहाळ झाल्या नंतर किंवा चोरीस गेल्यानंतर त्याची माहीती तात्काळ पोलीसांना द्यावी तसेच त्याबाबतची माहीती https://www.ceir.gov.in या पोर्टलवर माहीती भरून तक्रार नोंद करावी. त्यामुळे गहाळ झालेले किंवा चोरीस गेलेले मोबाईलचा तांत्रीक पदधतीने शोध घेता येईल.**




**पोलीस स्टेशन बेला सामुहीक बलात्कारात पोलीस तपासांतील त्रृटी मुळे आरोपीला मा. उच्च न्यायालयाने आरोपी निर्दोष मुक्त केल्याचे वृत्तपत्रातील बातमीबाबत...**

दिनांक १७/०७/२०२५ रोजी एका वृत्तपत्रात Lapses in investigation by Bela Police lead to acquittal in gangrape case अशा मथळाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे.

फिर्यादीने तिच्यावर सामुहीक बलात्कार झाल्याची तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन बेला अप क्र १५४/२०२२ कलम ३७६ (ड) , ५०६ (२),३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. बेला पोलीसांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास करून आरोपी नामे क्रं १ सुभाष मोतीराम जुमनाके, वय २६ वर्षे, रा. विखणी, जसापुर, ता. समुद्रपुर, जि. नागपुर, आणि आरोपी क्रं २ यांच्या विरूध्द दोषारोप पत्र मा. यायालयात दाखल केले होते. सदर गुन्हयातील दोन्ही आरोपीतांना मा. जिल्हा व सत्र न्यायालय नागपुर यांनी दोषी ठरवुन कलम ३७६ (ड), ३४ भा.द. वि. २० वर्षे सश्रम कारावास आणि १५ हजार रूपये दंड ,दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा आणि ५०६ (२) भा.द.वि. मध्ये १ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली

आहे. आरोपी क्रं २ याने मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर येथे अपील केली असता मा. उच्च न्यायालयाने सदर आरोपी क्रं २ याला ईतर बाबींना गृहीत धरून निर्दोष मुक्त केले आहे. पोलीस तपासांतील त्रृटी मुळे आरोपीला निर्दोष सोडल्याबाबत मा. न्यायालयाच्या निर्णयांमध्ये कोठेही नमुद नसुन यातील आरोपी क्रं १ सुभाष मोतीराम जुमनाके, वय २६ वर्षे, रा. विखणी, जसापुर ता. समुद्रपुर जि नागपुर याची शिक्षा कायम आहे.

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १७/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १८/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत अण्णाभाऊ साठे नगर, पेठ बुधवार, काळे चौक, हत्तीखाना, सावरगाव रोड येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री बापु रोहोम यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच गळपुरा चौक येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये पोलीस स्टेशन काटोल चे अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होत


बेकरी ★ जनरल






SAFAL ACADEMY
POLICE BHARTI
MPSC
BANKING
RAILWAY/SSC
BOLERO

# अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन मौदा :—** १७/७/२०२५ चे ०६/३० वा यातील मृतक भोजराज केशवराव मेश्राम, वय ५९ वर्ष, रा. आजनगाव, मौदा हे गायींसाठी चार आणण्यासाठी आजनगाव शिवारात स्वत:च्या शेतात गेला असता चारा काढणेकरीता तनसीच्या ढीगात हात टाकला असता मृतकला विषारी सापाने चावा घेतला मृतकाला उपचारा करीता ग्रामीण रुग्णालय येथे घेवुन गेले असता वैदयकीय अधिकारी यांनी त्यांना मृत घोषीत केले. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन मौदा येथे मर्ग नोंद करण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**